पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८
कामगार कल्याण विभाग
जा क्र. काक/३/कावि/९८/२०१८
दि. १२/०७/२०१८

विषय :- कामगार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.
संदर्भ :- १) परिपत्रक क्र. काक/३/कावि/१६९/२०१३ दि.१९/०३/२०१३
२) परिपत्रक क्र. काक/३/कावि/१८०/२०१४ दि.२४/०६/२०१४

परिपत्रक,

संदर्भिय परिपत्रकान्वये मुख्य मालक म्हणून कामगार कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे. तसेच कंत्राटदारांनी नेमलेल्या कामगारांना किमान वेतनाप्रमाणे वेतन अदा केले जात आहे किंवा कसे? तसेच इतर अनुषंगिक कायद्याने देय असलेले लाभ दिले जात आहे किंवा कसे? याची खातरजमा करण्यासाठी ठेकेदाराने कागदपत्रे देयकासोबत सादर केल्यानंतरच देयके अदा करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

या परिपत्रकानुसार कामगारांचे वेतन किमान वेतन दराने बँक खात्यात जमा केल्याचे तसेच भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, कामगार कल्याण निधी यांचा भरणा संबंधित शासकीय संस्थेकडे केल्याचे कागदपत्रे देयकासोबत जोडण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे. मात्र काही विभाग उपरोक्त कागदपत्रे न जोडताच देयके लेखा विभागाकडे प्रदानासाठी सादर करतात. त्यामुळे यात नियमबाह्यता होते. या नियमबाह्यतांना संबंधित विभाग जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. तसेच, कंत्राट लम्प-सम स्वरूपाचे आहे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे असले तरी मुख्य मालक या नात्याने वरील सर्व बाबींची खातरजमा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. त्यामुळे सर्व विभागांनी त्या कामाशी संबंधित कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांचे बँक स्क्रोल, उपस्थितीपत्रके, वेतनपट, भविष्य निर्वाह निधी व ईएसआय चलने तसेच इतर अनुषंगीय दस्तावेज देयकासोबत न चुकता जोडावेत. तसेच कर्मचारी/ कामगार यांचे वेतनावर करण्यात येणारा खर्च हा कंत्राटाच्या निवेदेतील (तांत्रिक मान्यता) लेबर कंपोनंटशी जुळणारा असावा. तसेच कामगारांचे कंत्राटावरील पीएफ, ईएसआय, वेतन इत्यादींचे प्रदाने त्या कंत्राटानुसार स्वतंत्रपणे करण्यात यावे. ते त्या कंत्राटदाराच्या इतर प्रकल्प / आस्थापनांचे एकत्रित असू नये याचे काटेकोरपणे पालन सर्व विभागप्रमुखांनी करावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८